JAWAHAR MEDICAL FOUNDATION'S

# A.C.P.M.College of Nursing,Dhule

# STATE GOVERNMENT RESOLUTION

A.C.P.M. College of Nursing DHULE

Principal
A.C.P.M. College of Nursing,
Dhule.

जवाहर मेडिकल फाउंडेशन, धुळे या संस्थेस धुळे येथे बी.एस.सी.नर्सिंग महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्रमांक- एनयुआर-१३०६/प्र.क्र.३०/०६/शिक्षण-१

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- २४ ऑगष्ट, २००७

वाचा:-
१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/ पीवी/९०४/२००५ दिनांक २९.१२.२००५.
२) या विभागाचे समक्रमांकाचे आवश्यकता प्रमाणपत्र दिनांक ३१.१.२००६
३) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ-१८-१९/३२३०-आयएनसी, दिनांक १.११.२००६
४) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ.१८-१९/३२३०-आयएनसी, दिनांक १८.६.२००७
५) चेअरमन, जवाहर मेडिकल फाऊंडेशन,धुळे यांचे दिनांक १९.७.२००७ चे पत्र.

**प्रस्तावना:-** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये जवाहर मेडिकल फाऊंडेशन, धुळे या संस्थेस धुळे येथे ५० विद्यार्थी क्षमतेचे बी.एस.सी.नर्सिंग महाविद्यालय सुरू करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झाला होता. त्यानुसार शासनाने सदर संस्थेस संदर्भ क्र. २ अन्वये शासनाचे आवश्यकता प्रमाणपत्र प्रदान केले होते. भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी जवाहर मेडिकल फाऊंडेशन, धुळे या संस्थेस संदर्भ क्र. ३ अन्वये सन २००६-०७ साठी ५० विद्यार्थी क्षमतेचे नवीन बी.एस.सी. नर्सिंग महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता दिली होती. सदर पत्र संस्थेस विलंबाने प्राप्त झाल्यामुळे संस्थेस सन २००६-०७ मध्ये बी.एस.सी.नर्सिंग महाविद्यालय सुरु करता आले नाही. संस्थेस आता केंद्रीय परिषदेने संदर्भ क्र.४ च्या पत्रान्वये सन २००७-०८ साठी ५० विद्यार्थी प्रवेश करण्यास मान्यता दिली आहे. भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेली मान्यता लक्षात घेऊन सदर संस्थेस धुळे येथे बी.एस.सी.नर्सिंग महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-** भारतीय परिचर्या परिषद,नवी दिल्ली यांनी संदर्भ क्र.४ च्या पत्रान्वये जवाहर मेडिकल फाऊंडेशन, धुळे या संस्थेस सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षात ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे बी.एस.सी.नर्सिंग महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता दिली आहे. यास्तव सदर संस्थेस सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षात ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे बी.एस.सी. (नर्सिंग) महाविद्यालय सुरू करण्यास याव्दारे खालील अटी व शर्तीच्या अधिनतेने शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. **अटी व शर्ती :-**

१) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश राज्यशासन/केंद्रशासन/मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालयांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर प्रवेशाकरिता कार्यपद्धतीनुसार अवलंबण्यात यावी.

Suradkar/GR-BSC/ 1

07/9/07

Chitale Sir to discuss

45293
4-9-7

Chairman

Vice Chairman.

Secretary.

Principal
A.C.P.M.College of Nursing,
Dhule.

२) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली महाराष्ट्र परिषद व राज्य शासन यांनी बी.एस.सी.नर्सिंग अभ्यासक्रमाबाबत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

३) भारतीय परिचर्या परिषद, मुंबई यांनी घातलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिट्युशन प्रोव्हिबिशन ऑफ कॅपिटेशन फी ॲक्ट, १९९७ (महाराष्ट्र ॲक्ट १९८८) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) शासकीय नियम/कायदा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपद्धती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

६) संस्थेने त्यांच्या संस्थेत शासकीय वैद्यकीय / परिचर्या महाविद्यालयातील शिक्षकांस सेवा निवृत्त अथवा स्वेच्छानिवृत्त असल्याखेरीज कोणत्याही परिस्थितीत नोकरीत ठेवणार नाही याबाबतचे रू.५०/- च्या स्टँप पेपरवरील नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र शासनास सादर करणे आवश्यक राहील.

७). भारतीय परिचर्या परिषद,नवी दिल्ली व महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई यांनी बी.एस.सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रमाणकांची योग्यरित्या पूर्तता करून संस्थेने दरवर्षी परिषदेची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

८) संस्था आवर्ती / अनावर्ती स्वरूपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही असे लेखी अभिवचन संस्थेने शासनास दिले पाहिजे.

१०) संस्थेने बी.एस.सी. नर्सिंग महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची संलग्नता मिळाल्यानंतरच विद्यार्थी प्रवेशित करावेत.

११) सदर मान्यता संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या तपासणी अहवालाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१२) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नयेत.

१३) संस्थेने गुणवत्तेवर आधारीत प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियंत्रण समिती मुंबई यांचेकडून मंजूर घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या फी शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क समितीकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१४) भारतीय परिचर्या परिषदेकडून संस्थेला २००७-०८ साठी नियमित मान्यतेचे प्रमाणपत्र (Permission Certificate) मिळाल्यानंतरच प्रत्यक्ष विद्यार्थी प्रवेश करावेत.

सदर आदेश भारतीय परिचर्या परिषद नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेनुसार, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(मुकुंद कांबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव राजभवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई.
मा.उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई.
सचिव, भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली

Suradkar/GR-BSC/ 2

Principal
A.C.P.M. College of Nursing,
Dhule.

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पुर्व) मुंबई-४०० ०५१.
कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क समिती, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व) मुंबई-४०० ०५१.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
महाराष्ट्र परिचर्या परिषद, राज्य कामगार विमा योजना रूग्णालय परिसर,नर्सिंग हॉस्पिटल, २ रा मजला, लाल बहादुर शास्त्री मार्ग, मुलुंड (प),मुंबई ८० (पत्राने)
अध्यक्ष, असोशिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ अनएडेड प्राव्हेट मेडीकल अँड डेंटल कॉलेजेस महाराष्ट्र, पोटमाळा श्रीजी हाऊस, ७५ मिंट रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१
अध्यक्ष, जवाहर मेडिकल फाऊंडेशन, एसीपीएम कॉलेज ऑफ नर्सिंग, साक्री रोड धुळे ४२४ ००१
मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
निवडनस्ती (शिक्षण-१)

Principal
A.C.P.M.College of Nursing,
Dhule.

पी.बी.बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमास मान्यता देण्याबाबत.

जवाहर मेडीकल फाऊंडेशन, साक्री रोड, धुळे संचलित जेएमएफचे, एसीपीएम कॉलेज ऑफ नर्सिंग, साक्री रोड, धुळे.

# महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय, क्रमांक: एनयुआर-२०२१/प्र.क्र.१६८/२१/शिक्षण-१

९ वा मजला, नवीन मंत्रालय, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.

दिनांक: २० डिसेंबर, २०२१.

वाचा : १) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र. मआविवि/ पीबी/युजी/पी-५/७४८/२०२०, दिनांक २९.१२.२०२०.

२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्र.एनयुआर-२०१७/प्र.क्र.२१२/१७/शिक्षण-१, दि. २८ फेब्रुवारी, २०१८.

३) संचालक, वैद्यकीय शिक्षण यांचे पत्र क्र. एनयुआर/ एसीपीएम कॉलेज ऑफ नर्सिंग/बी.एस्सी/धुळे/तपासणी अहवाल/ई/१३७६५/२०२१, दि.१३.१०.२०२१.

**प्रस्तावना:**

जवाहर मेडीकल फ़ाऊंडेशन, साक्री रोड, धुळे संचलित जेएमएफचे, एसीपीएम कॉलेज ऑफ नर्सिंग, साक्री रोड, धुळे या संस्थेचा पी.बी.बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.(१) च्या पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून शासनास प्राप्त झाला होता. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी सदर प्रस्तावाची शिफारस केली होती. सदर संस्थेस मान्यता देण्याच्या अनुषंगाने संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार, सदर संस्थेची संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेमार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली. संचालक, वैद्यकीय शिक्षण यांनी सक्षमता तपासणीचा अहवाल संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सक्षमता तपासणी समितीने उक्त संस्था पी.बी.बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास सक्षम असल्याची शिफारस केली आहे. सक्षमता तपासणी समिती व संचालक, वैद्यकीय शिक्षण यांची शिफारस विचारात घेऊन, उक्त संस्थेस शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह पी.बी.बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

सक्षमता तपासणी समिती व संचालक, वैद्यकीय शिक्षण यांची शिफारस विचारात घेऊन, जवाहर मेडीकल फाऊंडेशन, साक्री रोड, धुळे संचलित जेएमएफचे, एसीपीएम कॉलेज ऑफ



Principal
A.C.P.M.College of Nursing,
Dhule.

Scanned with CamScanner

नर्सिंग, साक्री रोड, धुळे या संस्थेस सन २०२१-२२ साठी ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह पी.बी.बी.एस्सी.(नर्सिंग) अभ्यासक्रम सुरू करण्यास पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून याव्दारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :

१) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेशाकरिता राज्य शासन/ केंद्रशासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.

२) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी पी.बी.बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

३) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी घातलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिट्युशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट क्र.VI १९८८) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) शासकीय नियम /अधिनियमाच्या आधारे तसेच मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपद्धती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

६) संस्था, त्यांच्या संस्थेत शासकीय वैद्यकीय/ दंत /परिचर्या महाविद्यालयातील शिक्षकांना ते नियत वयोमान सेवानिवृत्त अथवा स्वेच्छा सेवानिवृत्त असल्याखेरीज कोणत्याही परिस्थितीत नोकरीत ठेवणार नाही.

७) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी पी.बी.बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रमाणकांची योग्यरित्या पूर्तता करून संस्थेने प्रथम तुकडी बाहेर पडेपर्यंत दरवर्षी शासनाची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

८) संस्था आवर्ती / अनावर्ती स्वरूपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही.

९) सदर मान्यता संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या तपासणी अहवालाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१०) संस्थेने पी.बी.बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची संलग्नता मिळाल्यानंतरच विद्यार्थी प्रवेशित करावेत.

११) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नयेत.

Principal
A.C.P.M. College of Nursing,
Dhule.

C:\WORKS\Education 1\सन 2018\04 PBBSC\CR 168-2021 जवाहर मेडीकल फाऊंडेशन,साक्री रोड,धुळे संचलित एसीपीएम कॉलेज ऑफ नर्सिंग,साक्री रोड,धुळे.Docx

Scanned with CamScanner

१२) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्यांना प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई अथवा तत्सम प्राधिकरण यांचेकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरण यांच्याकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८, कलम ६४ नुसार शासनास प्रदत्त अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. श्री.पुं. कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (वै.शि.), यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव, भारतीय परिचर्या परिषद, कोटला रोड, नवी दिल्ली ११० ००२.
७. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई.
८. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
९. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
१०. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ व ९ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.
११. शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रज्ञान इमारत, ३०५, ३रा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा(पू), मुंबई-४०००५१
१२. प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई.
१३. अध्यक्ष/सचिव, जवाहर मेडीकल फाऊंडेशन, साक्री रोड, धुळे-४२४००१.
१४. अवर सचिव, शिक्षण-२, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. निवडनस्ती (शिक्षण-१).

Principal
A.C.P.M. College of Nursing,
Dhule.

Scanned with CamScanner